सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र

जानेवारी-२०२२ वर्ष -३, अंक-३

कार्यालय - संत एकनाथनगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कौम्प्युटर ट्रेनिंग सेंटर , बिबवेवाडी,, पुणे - ४११०३७

## श्री. एम. एम. कुलकर्णी, सेवक संघाचे नवे कार्यकारी अध्यक्ष

डॉ. शेषराव पाटील यांनी कार्यकारी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदरचे पद काही महिन्यांपासून रिक्त होते. तथापि दि. ४ जानेवारी रोजी झालेल्या सेवक संघाच्या कार्यकारिणीच्या आभासी सभेत सदर पद भरण्यात बाबत व नेमणूक करण्याबाबत चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने श्री. एम. एम. कुलकर्णी यांना सदरची जबाबदारीबाबत अध्यक्ष यांनी विनंती केली असता त्यांनी ती मान्य केलेली आहे. त्यामुळे आता सेवक संघाच्या कामास अधिक गतिमानता येईल. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## रौप्य महोत्सवी वर्ष कार्यक्रम

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ महाराष्ट्र,२८ जानेवारी २०२२ रोजी २५ वर्ष पूर्ण करत आहे. त्यादिवशी रौप्य महोत्सवी कार्यक्रमास सुरुवात करून महोत्सव वर्षाचे उद्‌घाटन करण्याचे नियोजित होते तसेच त्याच दिवशी सेवक संघाचे विशेषांक स्मरणिकेचे प्रकाशन पुणे येथे आयोजित करण्याचे प्रस्तावित होते. तथापि सद्यस्थितीत पुण्यात सुरू असलेल्या कोरोना-ओमिक्रॉन साथीच्या तीव्र प्रादुर्भावामुळे सदर कार्यक्रम आता पुढे ढकलण्यात आला असून तो कार्यक्रम जागतिक वन दिनी २१ मार्च २२ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

## सेवक विशेषांक ....

सेवक विशेषांक संबंधात बैठक श्री. वि. त्र्यं. पत्की, निवासस्थानी दिनांक १२/१२/२०२१ रोजी सेवक सदस्य सर्वश्री मदन कुलकर्णी, वि. त्र्यं. पत्की

## प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

१२/१२/२०२१ रोजी सेवक सदस्य सर्वश्री मदन कुलकर्णी, वि. त्र्यं. पत्की, अरविंद आपटे, पी बी धानके यांची बैठक झाली. बैठकीत विशेषांकातील लेखांची पाने १०० पर्यंत मर्यादित ठेवण्यावर निर्णय घेण्यात आला.

---------------oo-------------

## कॅम्पा अंतर्गत रोपवनांचे मूल्यांकन काम पूर्ण .....

शिल्लक ४७ कामांचे मूल्यांकन काम दसरा ते दिवाळी या दरम्यानच्या कालावधीमध्ये पूर्ण केले. ही कामे ठाणे, धुळे, पुणे, अमरावती, यवतमाळ,नागपूर या वनवृत्तामध्ये असून त्यांचे एकूण क्षेत्र ६१९ हेक्टर होते. त्याचा अंतिम अहवाल मुकाअ, महाकॅम्पा यांना सादर करण्यात आला आहे.

## कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा अपडेट ......

अभयारण्याचा आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले होते. सदर आराखडा चमूने पूर्ण केला असून हा २०६ पानी पाच वर्षांचा आराखड्याचे प्रारूपास श्री विश्वास सावरकर यांनी अंतिम करून प्रमुवसं (वन्यजीव) म.रा.तथा मुख्य वन्यजीव रक्षक महाराष्ट्र राज्य यांना अभिप्रायार्थ सादर करणेत आला आहे.

----------oooo------------------

## सेवक संघ वृक्ष गणना कामासाठी संगणकीय प्रणाली तयार करणार

काही आठवड्यांपूर्वी धुळे शाखा चाळीसगाव नगरपरिषदेच्या वृक्ष गणनेच्या कामासाठीच्या निविदा

या अंकात . . . . .

१. श्री. एम. एम. कुलकर्णी, सेवक संघाचे नूतन कार्यकारी अध्यक्ष ................१
२. रौप्य महोत्सवी वर्ष कार्यक्रम ... .......१
३. सेवक विशेषांक संबंधात बैठक .........१
४. कॅम्पा निधी अंतर्गत रोपवनाचे .........१ मूल्यांकन काम
५. कन्हारगाव अभयारण्याचा आराखडा....१
६. वृक्षगणना कामासाठी संगणकीय प्रणाली.. १
७. कार्यकारी मंडळ बैठक वृत........ .....१
८.सेवक संघ,उपविधीची ओळख ......... १
९.निधन वार्ता ... ..... ......... २
१०. नवी लेख मालिका........ २

प्रक्रियेत सहभागी झाली होती. तथापि सदर निविदा अटीप्रमाणे वृक्ष गणना कामासाठी संगणकीय प्रणालीचा वापर करणे नमूद होते. या अटीची पूर्तता करू न शकल्याने सेवक संघासोबत इतरही सर्व निविदा रद्द करण्यात आल्या. सद्यस्थितीत महाराष्ट्रातील सर्व महानगर पालिका व नगर परिषदा या आता वृक्ष गणनेचे संगणकीय प्रणालीचा वापर करूनच काम करण्याचे नियोजित करत असल्याने त्यासाठी सेवक संघाने स्वतःचे सॉफ्टवेअर विकसित करण्याचे काम तज्ञ्यामार्फत हाती घेतले आहे. सॉफ्टवेअर तयार झाल्यास सेवक संघ वृक्ष गणनेचे कामामध्ये सक्षमरित्या सहभागी होऊ शकेल.

*****************************

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाची दि.४-१-२०२२ रोजीच्या आभासी बैठकीत खालील विषयावर चर्चा झाली.

१.मागील बैठकीच्या इतिवृत्ताचा आढावा व पाठपुरावा.

२."महाराष्ट्र वनवार्ता" नियत कालीक सेवकमार्फत प्रसिध्द करणे.

३.सेवकचा रौप्य महोत्सवी अंक प्रसिध्द करणेची कार्यप्रणाली.
४. CAMPA वनीकरण मूल्यांकन कामाची प्रगती.
५.कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा तयार करणेचा कार्य आढावा.
६.सेवक रौप्य महोत्सव अंक निर्मिती कामाची प्रगती.
७.चाळीसगाव नगर परिषद क्षेत्रातील वृक्षगणना कामाबाबत आढावा व पुढील कार्यप्रणाली.
८. कै.हेमंत ठाणेदार, कै.निशिकांत पेठकर दिवंगत सेवक सदस्य व इतरांना श्रध्दांजली देणे.
९. कार्यकारी अध्यक्षाची निवड.
१०. सा. व. विभाग औरंगाबाद यांची रोपे पुरवठ्यासाठी निविदा
११.आयत्यावेळी येणारे विषय.

---

## निधन वार्ता

श्री.निशिकांत यशवंत पेठकर सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी यांचे दि.१-१-२०२२रोजी वृध्दापकालाने दु:खद निधन झाले. १९६७-६९च्या इंडियन फॉरेस्ट कॉलेजचे ते अधिकारी होते. सरळमार्गी सचोटी असलेले व निष्ठावंत वन अधिकारी म्हणून लौकीक त्यांनी मिळविला होता. दोन मुली व जावई त्यांचे मागे आहेत. ईश्वर त्यांचे आत्म्यास शांती प्रदान करो ही प्रार्थना व भावपूर्ण श्रद्धांजली.

### संघाचे जेष्ठ सदस्य श्री.पत्की यांच्या लेखणीतून कै. हेमंत ठाणेदार

कै. हेमंत ठाणेदार १९७४ ते १९७७ वनविकास महामंडळात मांडवी येथे कार्यरत होते. मांडवी येथील निवासी संकुल शिरसाड आगार व वन विश्राम गृह, सकवार केंद्र त्यांनी स्थापिले. त्यावेळी श्री.आबा बंडु खोत भाताणा केंद्र प्रमुख श्री.ए. डी. इनामदार माजिवली केंद्र प्रमुख श्री.पी.बी.दुर्वे वाडा केंद्र प्रमुख श्री. एम.व्ही. चुरी चिंबिपाडा केंद्र प्रमुख कार्यरत होते.मी तेंव्हा तिथे सहाय्यक व्यवस्थापक व श्री.प्रकाश घुले साहेब विभागीय व्यवस्थापक होते.श्री.किरपेकर साहेब रिजनल व्यवस्थापक होते. सर्वांचे टीमवर्क दृष्ट लागावे असे होते. निष्ठा आणि विश्वास याचे बळावर कामे चालत. यापैकी श्री. इनामदार/खोत/ ठाणेदार/चुरी आज हयात नाहीत याचे दु:ख होते. ठाणेदार ब्रीज पण छान खेळायचे. सेवानिवृत्तीनंतर ते सेवकच्या कार्याशी निगडीत होते. विभागीय चौकशी अधिकारी म्हणून त्यांनी अनेक प्रकरणे हाताळली. एक हुशार मेहनती चौकस वनाधिकारी म्हणून त्यांची ख्याती होती.

---

### सेवक संघ,उपविधीची ओळख

सेवक वार्ता अंकांतून ८ भागातील लेख मालिकेतून सेवक संघ, महाराष्ट्रच्या सुधारीत उपविधीची माहिती आपण वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे अंक सेवक संघाच्या संकेतस्थळावर आहेत.

### नवी लेख मालिका

या अंकापासून "सेवक संघाचे सेवेकरी " ही नवी लेख मालिका सुरू करणेत येत आहे.यात सेवक संघाचे जडणघडणीत गेल्या २५ वर्षात ज्या सदस्यांनी मोलाचे योगदान दिले, त्यांच्या कामाबाबत ओळख करून देण्यात येईल.

आपणास विनंती आहे की, आपले लेख पाठवावेत.

### "सेवक संघाचे सेवेकरी "

### श्री वसंत जोशी - एक सेवक संघ इतिहास पुरुष

-संभाजी गवळी

सेवक संघाच्या रौप्य महोत्सवाच्या टप्प्यावर थोड्याथोडक्या नव्हे तर गेल्या तब्बल पंचवीस वर्षातील वाटचालीचा इतिहास पाहता व वन विषयक संवर्धन कारणे सामाजिक बांधिलकीचा बारकाईने अवलोकन करून आढावा घेता असे आढळून येते की कुठल्याही संघटनेच्या स्थापनेबरोबर चालनेला अविरतपणे बळ देऊन पुढे नेण्याचे काम हातावर बोटावर मोजण्याइतकेच सेवाभावी कार्यसम्राट असतात. अशीच व्यक्तिमत्वे इतिहास घडवतात. सेवक संघाच्या कामात श्री वसंत जोशी यांची गणना करावी लागते. श्री वसंत जोशी यांचे सेवक संघाचे इतिहास पुरूष असे वर्णन केले पाहिजे.

१९९५ मध्ये वनविभागातून सेवानिवृत्तीनंतर वसंत जोशी यांनी पुण्यातील मोजक्या समविचारी सहकाऱ्यांच्या सहाय्याने सेवक संघाची मुहूर्तमेढ रोवून व आवश्यक असलेली कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दिनांक २८ जानेवारी १९९७ रोजी नोंदणीचे प्रमाणपत्र मिळविले व सेवक संघाची विधीवत स्थापना झाली. त्यासंबंधातील विलक्षण मेहनत, जिद्द व कल्पकता वगैरेचा तपशिल या अंकात इतरत्र दिलेला आहेच. सेवक संघाच्या कल्पक स्थापनेचे वसंत जोशी हे अधिनायक आहेत.संघ स्थापनेचे त्या क्षणापासून ते रौप्य महोत्सवाच्या पूर्वसंध्येला आजतागायत म्हणजे सतत पंचवीस वर्ष सेवक संघाची मौलिक जडण-घडण, अवघड वाटचाल, शाश्वत स्वरूपाचे बळकटीकरण, आणि साकल्यपूर्ण विस्तार अशा विविध अंगी जडणघडणीत त्यांनी नेहमीच जबाबदारी घेतल्याचे दिसते.
वसंत जोशी यांनी, सेवानिवृत्तीनंतर, जेव्हा की हा काळ निवांतपणे जीवन व्यतीत करण्याचा असताना, सतत पंचवीस वर्ष सेवक संघासाठी दिला ही मोठी आश्चर्यजनक व मती गुंग करायला लावणारी वागणूक आहे. हे अमूल्य असे योगदान आहे, सेवाभाव आहे. सेवक संघासाठी वसंत जोशी यांनी सेवानिवृत्तीनंतरचे जीवन पणाला लावले असे म्हणणे उचित राहील.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी